Soyrik pune
A Brahmin Matrimony Portal

# ब्राह्मणांचे विवाह विधी

"शुभ मंगल सावधान" विवाह प्रसंगी सावधान करणारा हा मंत्र ! खरं तर शुभ मंगल ठरवताना सावध रहायला हवं ! लग्नगाठी स्वर्गात पक्या होतात आणि पृथ्वीवर बांधल्या जातात. या रेशीमगाठी बांधणं सुलभ होण्यासाठी खूप काळजी काळजी घ्यावी लागते. मुलाचं किंवा मुलीचं शिक्षण, नोकरी, मिळकत, घराणं, संस्कार, सवयी एक ना दोन. यासाठी निश्चितता हवी म्हणूनच सहज उपलब्ध आहे चित्पावन मित्र असोसिएशनच www.soyrikpune.com हे अद्ययावत पोर्टल. या वेब पोर्टलवर घरबसल्या मुलाचं किंवा मुलीचं स्थळ शोधू शकता, अगदी खात्रीशीर माहितीसह.

www.soyrikpune.com मधून लग्न ठरल्यावर लग्नाच्या बैठकीपासून ते मांडव परतण्या पर्यंत काय काय समारंभ, विधी असतात ते आपल्याला कोण सांगणार याची अजिबात चिंता नको, त्यासाठीच हा लेखन प्रपंच.

साखरपुड्यापासून लग्न पार पडेपर्यंत काय काय  कार्यक्रम असतात. कोणकोणते मंगल विधी साजरे करायचे, त्याची तयारी कशी करायची, त्याचीच माहिती या लेखात दिली आहे. आपल्या घरातील वडिलधाऱ्यांनी मार्गदर्शन करावं तसंच काहीसं ! सर्वांचा  आनंद व्दिगुणीत करण्यासाठी छान नियोजन हवे. त्यासाठीची आवश्यक माहिती, अनुभव आणि प्रथा यांचा विचार करून ठरविली आहे ती तुमच्यासाठी सादर करत आहोत.

**विवाहाच्या आधीचे कार्यक्रम  -------------**

१. लग्नाची बैठक
२. साखरपुडा
३. मुहूर्त करणे
४. निमंत्रण पत्रिका छापणे व देवाला अक्षता
५. बस्ता बांधणे व खरेदी
६. व्याही भोजन
७. ग्रहमख व केळवण
८. मेंदी व चुडा

**कार्यालयातील विधी ----------------**

१. सीमांत पूजन व वाङ्निश्चय
२. घाणा भरणे व हळद
३. देवक बसविणे

| | | |
|---|---|---|
| ४. तेलफळ व गौरीहर पूजा | ५. लग्न | ६. कन्यादान |
| ७. विवाह होम (लाजा होम) | ८. सप्तपदी | ९. ऐरणी दान (झाल) |
| १०. भोजन | ११. लक्ष्मी पूजन | १२. सुनमुख |

**लग्नानंतर घरी करावयाचे कार्यक्रम -------------**

| | | | |
|---|---|---|---|
| १. कंकण सोडणे | २. पूजा | ३. बोडण | ४. जागरण गोंधळ |

## लग्नाची बैठक

वधू - वरांची पसंती झाली की दोन्ही घरची प्रतिष्ठित मंडळी वधूवरांसह एकत्र येतात व बैठकीत सर्व समारंभाचे नियोजन करतात. या बैठकीत खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जातात.

दोन्ही घरच्या मंडळींच्या सोयीनुसार व कार्यालयाच्या उपलब्धतेनुसार लग्नाची तारीख ठरविली जाते. कार्यालय बुक करण्यापूर्वी विवाह समारंभासाठी वधू व वराकडील किती मंडळी येणार याचा विचार केला जातो. वधूवरांचे अलंकार, कपडे व दोन्ही कडचे मानपान यावर चर्चा करून निर्णय होतो. त्याचवेळी साखरपुड्याचे स्थळ व तारीख ठरविली जाते. पूर्वीच्याकाळी ठरावाच्या याद्या लेखी होत असत परंतु आजकाल याद्या करण्याची पद्धत बंद झाली आहे. योग्य नियोजनासाठी ठराव एव्हढाच या बैठकीचा अर्थ आहे. बैठकीची सांगता स्वीट डिशने होते.

## साखरपुडा

साखरपुडा सर्वांना लग्न ठरल्याचे कळविण्यासाठी केला जातो. पूर्वीच्या काळी साखरपुडा वधूच्या घरी सुटसुटीत पद्धतीने होत असे. आता साखरपुडा म्हणजे मिनी लग्नाचाच भास असतो म्हणून हॉल व केटररची आवश्यकता असते. वधू वरांच्या सोयीने शक्यतो शनिवार - रविवार निवडला जातो. वधू-वर आपल्या पसंतीने अंगठ्या खरेदी करतात.



मुलीसाठी साडी व मुलासाठी मुलीच्या साडीला मॅचिंग पोशाख एकमेकांनीं आणण्याची सध्या पद्धत आहे. या समारंभाच्या धार्मिक साहित्याची यादी गुरुजींकडून घ्यावी व त्याप्रमाणे सामान आणावे म्हणजे विधी यथासांग पार पडतात. समारंभानंतर सर्वांना वाटण्यासाठी पेढे व दोन्ही कुटुंबातील जेष्ठ व्यक्तींसाठी भेट वस्तू आणाव्यात. पाहुणे मंडळींना मिष्टान्न भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता होते. या कार्यक्रमाचा सर्व खर्च वधू पिता करतो अशी प्रथा आहे पण आजकाल दोन्ही पार्टी मिळून सुद्धा करतात.

साखरपुडा म्हणजे एंगेजमेंट झाल्यावर वधूवरांना भेटण्याची अधिकृत परवानगी. कधी पिक्चर, कधी हॉटेलिंग अशा गमती जमती सुरु होतात.

## मुहूर्त करणे




वधू व वराच्या घरी शुभ दिवस पाहून सुपारीच्या गणपतीचे पूजन करतात व गूळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवून आरती करतात. या कार्यक्रमाला वाडा घरच्या (ज्यांचे आई-वडील, सासू सासरे आहेत) अशा पाच सुवासिनी बोलावितात. नंतर त्या पाच सुवासिनी हळकुंडे फोडतात ती मिक्सरमध्ये बारीक करून त्याची हळद घाणा भरण्याच्या वेळी वापरतात.

हळकुंडे फोडून झाल्यावर पाच सुवासिनींच्या हस्ते गव्हले करण्यास सुरुवात होते. गव्हल्याचे पाच प्रकार असतात - गव्हले, मालत्या, नखुल्या, बोटवे आणि फणूल्या. लग्न समारंभात वरमाईची ओटी भरण्यासाठी वधूपक्षाकडे मालत्या जास्त कराव्या लागतात. मुहूर्ताच्यावेळी पापड व सांडगे केले जातात. या सर्व वस्तू मुहूर्तापुरत्या थोड्याशा करतात व जास्त लागत असल्यास बाजारातून विकत आणण्याची सध्याची पद्धत आहे. ह्या मुहूर्ताच्या कार्यक्रमापासून विवाहाच्या सर्व कामाला सुरुवात होते.

## निमंत्रण पत्रिका छापणे व देवाला अक्षत

निमंत्रण पत्रिका घरी हाताने लिहून घरातल्या देवापुढे ठेवतात व नंतर छपाईसाठी देतात. पत्रिका छापताना कुलदेवता, घरातील ज्येष्ठ व्यक्तींची नावे, कार्यस्थळ, घरचा पत्ता व फोन नंबर तसेच शुद्धलेखन नीट पहावे लागते. निमंत्रण पत्रिका किती किमतीची आहे यापेक्षा त्यामध्ये कार्य सिद्धीला नेण्यास श्री समर्थ आहेत, हे असणे महत्वाचे.



देवाला अक्षत देण्यासाठी गुरुजींना बोलावण्याची पद्धत आहे. गुरुजी उपलब्ध नसल्यास वधूवरांच्या आई-वडिलांनी देवाला अक्षत ठेवली तरी चालते. अक्षत देताना वधू किंवा वराच्या वडिलांनी टोपी व आईने नथ घालायची पद्धत आहे. अक्षत घरच्या देवांना, नंतर गणपतीला व ग्रामदेवतेला ठेवण्याचा मान आहे. देवाला निमंत्रणाच्यावेळी पानसुपारी (विडा), तिळाचे पाच लाडू, नारळ, निमंत्रण पत्रिका, अक्षता व हळद कुंकू ठेवावे व प्रार्थना करावी. देवीला निमंत्रण देताना वरील सर्व वस्तूंसह देवीची ओटी भरावी व प्रार्थना करावी. देवांना अक्षत देऊन झाल्यावर जवळच्या पाच नातेवाईकांना अक्षत द्यावी. यानंतर सर्व आप्त, मित्र मंडळींना सोयीने निमंत्रण करावे. नवीन पद्धती प्रमाणे निमंत्रण करण्यासाठी इमेल व व्हॉट्स अँपचा वापर करतात.

## बस्ता बांधणे व खरेदी



वधू व वराच्या दोन्ही बाजूने बस्त्याची सुरुवात कुलदेवतांसाठीच्या खरेदीने होते. कुलदेव श्री शंकर असेल तर पांढरे वस्त्र म्हणजे धोतर खरेदी केले जाते. देवीसाठी साडी-चोळी खरेदी करतात. चित्पावनमध्ये बऱ्याच लोकांची कुलदेवी अंबेजोगाई असल्यामुळे देवीसाठी गुलाबी साडी खरेदी करण्याची पद्धत आहे. आपले कुलदेव व कुलदेवी कोणते आहेत याचा विचार करून किंवा घरातील मोठ्या व्यक्तींना विचारून परंपरेप्रमाणे देवाच्या वस्त्रांची खरेदी बस्त्याच्या सुरुवातीला करावी व नंतर बाकीची वस्त्रे घ्यावीत. वधू पक्षाकडील खरेदी - वधूपक्षाकडून वराचा पोशाख, वरासाठी एखादा दागिना घेतला जातो. वरमाईसाठी तीन साड्या (पैकी एक पांढरी), करवलीसाठी ड्रेस किंवा साडी, वरपित्यासाठी पोशाख तसेच वराकडील जेष्ठ व्यक्ती व वराच्या मामा मामीचा मान करण्याची पद्धत आहे. वधू पक्षाची स्वतःचीही खरेदी असते त्यात वधूसह घरातील सर्व व्यक्ती व नातेवाईक यांचा समावेश होतो.

याशिवाय वधूसाठी दागिने, शेला, रुखवताची भांडी व रुखवतावर ठेवण्याच्या इतर वस्तू, मुंडावळ्या,.

सहाण, गौरीहर, अन्नपूर्णा देवी व बाळकृष्णाच्या मूर्ती, दिवा किंवा समई इत्यादी खरेदी केली जाते. वरमाईसाठी  चौरंग, आरसा, कंगवा, बांगड्या, जोडवी व कुंकवाचा करंडा, चांदीचा कारल्याचा वेल, चांदीचे केळीचे पान, चांदीच्या लवंगा खरेदी केल्या जातात.

वर पक्षाकडील खरेदी -  वरपक्षाकडून वधूसाठी चार साड्या (वर्षंघडी - वाङ्निश्चयासाठी, हिरवी - तेलफळासाठी, महावस्त्र म्हणजे पैठणी किंवा शालू व लक्ष्मीपूजनाचे वेळी देण्यासाठी) घ्याव्या लागतात. वधूचे आईवडील, करवली, वधूचा भाऊ, वधूकडील ज्येष्ठ व्यक्ती व वधूच्या मामा मामीचा मान करण्याची पद्धत आहे. वर पक्षाची स्वतःचीही खरेदी असते त्यात वरासह घरातील सर्व व्यक्ती व नातेवाईक यांचा समावेश होतो. याशिवाय वराकडून वधूसाठी दागिने, ही मोठी खरेदी असते. गौरीहराचा मान म्हणून साडी, सौभाग्य वाण व तेलाचे भांडे याचा समावेश असतो.

## व्याही भोजन

व्याही भोजन म्हणजे मुलीचे आईवडील व ज्येष्ठ व्यक्तींना मुलाकडे जेवायला बोलाविणे. व्याही भोजनाचा उद्देश पूर्वी वेगळा होता. नातवंड होईपर्यंत मुलीचे आईवडील मुलीकडे जेवत नसत त्यासाठी वरपक्षाकडून वधूच्या घरच्यांना ही मेजवानी असे. आता ही प्रथा फक्त भोजन समारंभापूर्ती राहिली आहे. त्या बरोबरच दोन्ही बाजूंच्या लोकांचा परिचय सुद्धा होतो. आजकाल व्याहीभोजन हॉल घेऊन थाटामाटात केले जाते. या कार्यक्रमासाठी धार्मिक विधी नसतो हा समारंभ पूर्णपणे हौसेचा भाग असतो. मुलीकडचे नातेवाईक मेजवानीसाठी बोलाविले जातात, पंचपक्वानांचा बेत आखला जातो. लग्नाच्या दिवशी वरमाईचा जसा मान केला जातो तसाच वधूच्या आईचा-वडिलांचा व जवळच्या नातेवाईकांचा मानपान केला जातो.

## ग्रहमख व केळवण

विवाहापूर्वी योग्य दिवस पाहून हा धार्मिक विधी केला जातो. सुरुवातीला घराच्या मुख्य दरवाजावर गणपतीचे चित्र व तोरण लावले जाते. कार्यासाठी आकाशस्थ ग्रहांची अनुकूलता लाभावी म्हणून ग्रहयज्ञ करतात. ग्रहयज्ञाचा दिवस व त्यासाठी लागणारी तयारी गुरुजींना विचारून केली जाते. सर्व तयारी यादीप्रमाणे जय्यत ठेवावी लागते यामध्ये रोज लागणाऱ्या वस्तूंपेक्षा वेगळ्या वस्तू लागतात तरी या खरेदीचे योग्य नियोजन करावे. काही तयारी ऐनवेळी करावी लागते जसे कि गंध, पंचामृत वगैरे. ग्रहमखाचा विधी घरीच करावयाचा असतो. स्वयंपाक नैवेद्यासाठी म्हणून घरीच करतात. जादा पाने असल्यास हल्ली ऑर्डर देऊन बाहेरून स्वयंपाक मागविण्याची पद्धत रूढ होत आहे.

सोईचेव्हावे म्हणून घरचे केळवण याच दिवशी करण्याची पद्धत आहे. गव्हल्याची खीर, पुरण, लाडू, करंजी, मोदक अशा पारंपारिक दिमाखदार पदार्थांनी केळवणाची मेजवानी होते. चित्पावन कोकणस्थ, जे सध्या कोकणात राहतात त्यांच्याकडे केळवणाला उकडीचे मोदक करण्याची पद्धत आहे. छानदार महिरपी, रांगोळ्या काढून वधू किंवा वर व त्याचे आईवडील आणि जवळचे नातेवाईक यांचे एकत्र भोजन म्हणजे केळवण.

## मेंदी व चुडा



वधू - वर दोन्ही घरी हा कार्यक्रम असतो. लग्नाच्या आधी २- ३ दिवस हा समारंभ करतात. या कार्यक्रमात धार्मिक विधी नसतो. आजकाल स्त्रियांसोबत पुरुषही ह्या कार्यक्रमात सहभागी होतात व मेंदी काढून घेतात. प्रोफेशनल मेंदी रेखाटणारे लोक बोलाविले जातात ते वधू किंवा वरासोबत संपूर्ण वऱ्हाडाला मेंदी काढून देतात. नवऱ्यामुलीची मेंदी स्पेशल असते. नवरीला चुडा भरताना ९-११ प्लेन हिरव्या रंगाच्या बांगड्या भरतात. त्याचवेळी सोन्याच्या पाटल्या, बांगड्या व तोडे असतील त्याप्रमाणे घालतात कारण एकदा भरलेला चुडा लग्न समारंभ होईपर्यंत काढता येत नाही. त्याचप्रमाणे वरमाई व वधूची आई यांनाही हिरव्या बांगड्या भरतात. नंतर वऱ्हाडातील बाकीच्या स्त्रिया आपआपल्या आवडीप्रमाणे- मॅचिंगप्रमाणे बांगड्या भरतात. मेंदी व चुडा या समारंभाचे स्वरूप आजकाल थोडे बदलले आहे. बऱ्याचवेळा हा कार्यक्रम संध्याकाळी करतात. गाणी, डान्स सोबत पाणीपुरी, आईस्क्रीम अशा वेगवेगळ्या पदार्थांची हजेरी असते व सर्व नातेवाईक कार्यक्रमाचा आनंद लुटतात.

## सीमांत पूजन व वाङ्निश्चय

सीमांत पूजन हा विधी लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी संपन्न होतो आजकाल याला श्रीमंत पूजन असे म्हणतात. पूर्वी वराचे गावाच्या सीमेवर स्वागत करत व पूजा सत्कार करीत. आता कार्यालयात श्रीमंत पूजन करताना वधूला मोठी विवाहित बहिण असेल तर आधी ज्येष्ठ जामाताचे पूजन, मान, सत्कार व त्याबरोबरच जेष्ठ कन्येचा मान, सन्मान करतात. नंतर नियोजित वराचे पायधुवून पूजन करतात आणि वस्त्र, अलंकार, हारतुरे व वरदक्षिणा देऊन सन्मान करतात.

वाङनिश्चयाच्या कार्यक्रमात वरपक्षाकडून वधूचा अलंकार व साडीचोळी देऊन सन्मान केला जातो. वरमाई वधूची पाच फळांनी ओटी भरते व पाच सुवासिनी वधू-वरांना औक्षण करतात. हे दोन्ही विधी गुरुजींच्या मंत्रोच्चारांप्रमाणे होतात.

यानंतर रूढीनुसार वरमाईचा सत्कार वधूच्या आईकडून केला जातो. वरमाईला चौरंगावर बसविले जाते. हळदी कुंकू लावले जाते व चांदीच्या वाटीतून हलवा देण्याची पद्धत आहे. तसेच एका पात्रात (साधारणपणे तसराळ्यात) हरभरा डाळ व गूळ देण्याची पद्धत आहे. नंतर साडीचोळी देऊन ओटी भरतात. याचवेळी वधूवरांना औक्षण करणाऱ्या पाच सुवासिनींचा मान केला जातो. वर व वधू पक्षांकडील जेष्ठांची एकमेकांशी ओळख व मान केला जातो. यानंतर सर्व निमंत्रितांना मिष्टान्न भोजनाने कार्यक्रम संपन्न होतो. पूर्वी ह्या जेवणाला कढी भाताचे जेवण असे म्हणत असत.

## घाणा भरणे व हळद



लग्नाचे दिवशी सकाळी आंघोळीच्या आधी हा कार्यक्रम केला जातो. वधू - वर दोघांकडेही हा कार्यक्रम होतो. हा कार्यक्रम घरच्या केळवणाच्या दिवशी घरीसुद्धा करण्याची पद्धत आहे. ह्या कार्यक्रमाला उखळ, मुसळ व जाते लागते. ही साधने घरी उपलब्ध होत नसल्याने व कार्यालयात सहज मिळतात म्हणून हा विधी कार्यालयात घाणा भरण्यासाठी एका रेषेत चार पाट मांडतात व त्यावर शाल घालून गव्हाने चौरस काढतात. त्यावर आई-वडील, वधू / वर व करवली यांना बसवितात. एका दुरडीत (टोपलीत) उडीद व गहू ठेवतात. दोन मुसळे घेऊन एका कापडाने एकत्र बांधतात व त्याला आंब्याचा डहाळा बांधतात. आता कुलदेवता , स्थान देवता व पूर्वजांचे स्मरण व वंदन करून पाच सुवासिनी उत्सव मूर्तींना ओवाळतात, नंतर मुसळे व दुरडी घेऊन घाणा भरण्यास म्हणजेच कुटण्यास सुरुवात करतात. चौघांच्या मस्तकाला मुसळाने स्पर्श करतात. जमलेल्या स्त्रिया घाण्याच्या ओव्या म्हणून देवांचे स्मरण व देवांना आमंत्रण देतात.

घाण्याच्या ओव्या ह्या परंपरागत आहेत, काही ओव्या उदाहरण म्हणून खाली दिल्या आहेत.

घाणा भरियेला, विडा ठेवियला
आधी नमियेला गणराज ।।१।।

आम्हा घरी कारण, गणराज तुम्ही यावे
मांडवी रहावे, पाच दिवस ।।२।।

आधी मूळ धाडा दुरी दुरी
आम्हा कुळीचीये योगेश्वरी ।।३।।

रेखिले पायावरी कुंकवाचे स्वस्तिक
नवऱ्यामुलीचे आज, परोपरी कौतुक ।।४।।

घाण्याला घातले सव्वा खंडी गहू
मामा, मावश्या, आत्या मुलीला गोत बहू ।।५।।

मांडवाच्या दारी घागर पाण्याची
करवली मानाची ------------ ताई ।।६।।

लावा सखयांनो उडदांना तेल
भाग्यवती वेल वरमाई ।।७।।

अशा प्रकारे कांडून तयार झालेले पीठ लग्न समारंभात वेगवेगळ्या पदार्थांमध्ये वापरण्याची पद्धत होती.



यानंतर हळद लावण्याचा कार्यक्रम होतो. एका वाटीत खोबरेल तेल व हळद घेतात. आई - वडील व वधू/वर यांना पाटावर बसवून पायापासून डोक्यापर्यंत हळद लावतात. हळद लावताना आंब्याची किंवा विड्याची पाने घेतात व ती तेल हळदीच्या मिश्रणात बुडवून हळद लावतात. पहिल्याने वधू पक्षाकडे हळद लावण्याचा कार्यक्रम होतो. वधूपक्षाकडील शिल्लक राहिलेली थोडी तेल-हळद वर पक्षाकडे पाठवितात व ती उष्टी हळद वराला लावण्याची पद्धत आहे. यानंतर सुवासिक साबणाने स्नानविधी होतो.

## देवक बसविणे

देवक बसविण्याचा विधी वधू-वर दोन्हीकडे असतो. हा विधी लग्नाच्या दिवशी किंवा अगोदर घरीसुद्धा करता येतो. देवक बसविल्या नंतर सोयर - सुतक आल्यास ते पाळावे लागत नाही म्हणून आवश्यकता असल्यास लग्नाचे ८ दिवस आधीसुद्धा देवक बसविता येते. हा विधी संपूर्णपणे गुरुजींच्या सल्ल्याप्रमाणे केला जातो. तयारी जय्यत ठेवावी लागते. कार्यालयात विधी केल्यास कार्यालयातून सर्व सामान मिळते. हा विधी पूर्व - पश्चिम दिशा लक्षात घेऊन करतात. ह्या विधीमध्ये कार्य संरक्षणासाठी ६ देवता असतात. अविघ्न कलश म्हणजे सुगड व नारळाचे रूपाने कुलदेवतेचे पूजन केले जाते. यावेळी पुण्याहवाचन असते. या विधीमध्ये सर्व कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी देवतांचे पूजन व प्रार्थना केली जाते. पुण्याहवाचनाच्या वेळी घरच्या व जवळच्या नातेवाईकांना बोलावितात व ते, वधू - वर त्यांचे आई वडील यांना “घरचा आहेर” देऊन सन्मान करतात.

## तेलफळ व गौरीहर पूजा

कार्यालयात गौरीहराची एक जागा ठरलेली असते, त्या ठिकाणी गौरीहर मांडतात. नवरीमुलगी गौरीहरापाशी बसली की तेलफळ हा विधी होतो. रूढीप्रमाणे वरमाई वधूची हिरवी साडी चोळी, पाच फळांनी ओटी भरते. वरमाई वधूच्या माहेरच्या दिव्यासाठी एक तेलाचे भांडे ठेवते तसेच अन्नपूर्णेचा मान करते, गौरीहरासमोर मिठाई ठेवते.

यानंतर वधू गौरीहराची पूजा करते, वधूला धीर देण्यासाठी तिच्याजवळ करवली बसते. गौरीहर म्हणजे शंकर पार्वतीची पूजा असते. काही घराण्यात अन्नपूर्णेसोबत बाळकृष्णाची मूर्ती देण्याची प्रथा आहे. लाकडाचा गौरीहर विकत मिळतो. पाटावर तांदुळाची रास ठेवून त्यावर अन्नपूर्णा व बाळकृष्णाची मूर्ती ठेवतात व दोन्ही बाजुंना गौरीहर मांडतात. यावेळी नवरीमुलगी मामाकडून मिळालेली “अष्टपुत्री” म्हणजे पिवळी साडी परिधान करते. अन्नपूर्णा व बाळकृष्णाची पूजा करते व प्रार्थना करते.

## देवक बसविणे

प्रार्थना करताना म्हणण्याचा मंत्र खाली दिला आहे,

देवंद्राणि नमस्तुभ्यं देवेंद्र प्रियभामिनि
विवाहभाग्यमारोग्यम् पुत्र लाभम् च देहि मे

खालील प्रमाणे मराठीतूनही प्रार्थना केली तरी चालते
१) हे देवी "मी तुला नमस्कार करते, तू मला विवाहसुख, भाग्य, आरोग्य पुत्रलाभ दे" असे म्हणूनअक्षता वहाव्यात.

२) गौरी गौरी सौभाग्य दे, घरी आलेल्या अतिथीस औक्ष दे.

वधूकडे गौरीहर पूजन चालू असताना जावयाला रुखवत भोजन दिले जाते. नवरामुलगा, करवली मुलाचे आई वडील व काही जवळचे नातेवाईक अशी १० ते १५ माणसांची खास पंगत बसविली जाते. जेवणात पदार्थांचा खास वेगळा बेत असतो. मुख्य पानांना महिरपी मांडतात. यावेळी वराला दूध व केळे देतात त्यातील अर्धे तो वधूसाठी ठेवतो. मुलीची आई नवऱ्यामुलाला तुपाची आपोष्णी देते. तुपाची आपोष्णी झाल्यावर नवरदेव मंडपाकडे निघतो. यावेळी ताट उचलण्याऱ्या मोलकरणीचा मान करावा लागतो. नवरदेवाला मुख्य मंडपाच्या बाहेर घेऊन जातात व कार्यालयाच्या दारात औक्षण करून मुलीचे वडील नवरदेवाचा हात धरून त्याला लग्न लागणार असते त्या ठिकाणी स्टेजवर घेऊन येतात. याचवेळी लग्नासाठी हॉलमध्ये मंडळी जमू लागलेली असतात, त्यांचे स्वागत त्या त्या काळास अनुसरून पेयाने करतात.

## लग्न

मुहूर्त जवळ येऊन ठेपतो व लगीन घाई सुरु होते. लग्न लावायच्या जागेला "बोहला" असे म्हणतात. या ठिकाणी पूर्व - पश्चिम दिशा पाहून दोन पाट समोरासमोर ठेवले जातात, त्यावर अक्षता व कुंकवाचे स्वस्तिक काढतात. यानंतर नवरदेव वाजत गाजत हातात नारळ घेऊन बोहोल्यापाशी येतो.



मुलगा बोहोल्यावर आल्यावर गुरुजी “मुलीचे मामा” असा आवाज देऊन वधूला बोहोल्याचे ठिकाणी आणण्याचे सूचित करतात. वधूचा मामा गौरीहरापाशी येतो व  नवऱ्यामुलीला हाताला धरून बोहोल्याच्या ठिकाणी घेऊन जातो व नवऱ्या मुलासमोरील अंतरपाटाच्या पलीकडे उभी करतो. वधूवरांच्या हातात हार देण्यात येतात. दोन्हीकडील भटजी मंत्र म्हणण्यास सज्ज असतात. दोन्ही घरच्या करवल्या करा , दिवा म्हणजे लामण दिवा घेऊन सज्ज असतात. फोटोग्राफर त्यांच्या छत्र्या लावून तयार असतात. अशा सर्व जय्यत तयारीनिशी शुभमंगल विधी सुरु होतो. गुरुजी “स्वस्तिश्री गणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदम्।” अशा खणखणीत, स्वच्छ, शुद्ध स्पष्टोच्चारात मंगलाष्टके म्हणतात, याचबरोबरोबर हौशी नातेवाईकसुद्धा पारंपरिक किंवा स्वरचित मंगलाष्टके म्हणतात. पूर्वी संपूर्ण सभामंडपात अक्षता वाटत असत , अजूनही वाटतात पण काही ठिकाणी फक्त स्टेजवरील लोकांनाच फक्त अक्षता देतात. यांनतर “तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव ------” ह्या विष्णूच्या मंत्राचे स्मरण करून लग्न लागते.  सनई, चौघडे, वाजंत्री वाजवतात. नवरी नवऱ्याला व नवरा नवरीला हार घालतो. सर्व उपस्थितांना पेढे व फुले वाटतात. वधूवरांच्या जागा बदलतात. करवल्या वधूवरांना औक्षण करतात व सर्व निमंत्रित वधूवरांना शुभेच्छा देतात. लग्न लागल्यानंतर वरमाईची साखरेने ओटी भारतात.

## कन्यादान



कन्यादान विधी करण्यापूर्वी नवरीचे आईवडील वराची “मधुपर्क” पूजा करतात. त्यावेळी जावयाला सोवळे, जानवे, तांब्याचा दिवा, दक्षिणा देतात. लग्न समारंभातील पुढील विधीमध्ये वराने सोवळे नेसायचे असते, हल्ली रेडिमेड(शिवलेले) सोवळे मिळते त्याचाही वापर करता येतो. वधूसुद्धा रेशमी वस्त्र परिधान करून धार्मिक विधीसाठी सज्ज होते. वधू-वर, वधूचे आईवडील स्टेजवर येतात. मुलीची आई कलशातून पाणी घेऊन येते. कलशामध्ये सुवर्ण ठेवण्याची रीत आहे. मुलीची आई कलशातील पाण्याची धार प्रथम मुलीच्या वडिलांच्या ओंजळीत, नंतर वराच्या व वधूच्या ओंजळीतून काशाच्या भांड्यात सोडते. कन्यादानाचे वेळी कर्णफुले वगैरे सुवर्ण अलंकार मुलीला देण्याची प्रथा आहे. श्रीमंत लोक सालंकृत कन्यादान करतात.

“उत्तम प्रजा तुम्ही निर्माण करा. त्यासाठी मी माझी कन्या तुम्हास देत आहे” असा अर्थ असणारे मंत्र गुरुजी उच्चारतात. वधूवरसुद्धा आम्ही एकमेकांशी विश्वासाने राहू असे आश्वासन देतात.

यानंतर वधूला मंगळसूत्र घातले जाते. मंगळसूत्रामध्ये दोन सुवर्णमणी व एक वाटी माहेरची असते व दोन सुवर्णमणी व एक वाटी सासरची असते. बाकीची काळी पोत सोन्याच्या तारेमध्ये किंवा दोऱ्यात बांधलेली असते. त्यावेळी वरमाई मंगळसूत्रासोबत मुहूर्तमणी, जोडवी, विरोल्या, दागिने नवऱ्यामुलीला देते. विधियुक्त मंत्रोच्चारात वर, वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो. चित्पावन - कोकणस्थ ब्राह्मणांमध्ये १ वर्ष मंगळसूत्राच्या वाट्या उलट्या ठेवण्याची प्रथा आहे.

## विवाह होम - लाजा होम

गणेश पूजनाने वधूवर विवाहहोम करण्यास सिद्ध होतात. वधू आणि वर अग्नीची प्रार्थना करतात. अन्न, बल, पुत्र, धन इत्यादींची मागणी करतात. यावेळी अग्नी व प्रजापतीचे मंत्र म्हटले जातात. या होमात साळीच्या लाह्या आहुतीसाठी वापरतात म्हणून लाजाहोम म्हणतात.



यानंतर पाणिग्रहण हा विधी होतो. हा लग्नातील मुख्यविधी आहे, यावेळी पाणिग्रहणाचे मंत्र म्हणतात. वधूचा उजवा हात वर उजव्या हातात घेतो. यावेळी “कानपिळी” हा सोहळा साजरा होतो. वधूचा भाऊ वधूच्या हातात लाह्या देतो त्या होमात अर्पण केल्या जातात. रूढी म्हणून तो वराचा कान पिळतो व बहिणीला नीट सांभाळण्याचे वचन मागतो. त्यावेळी वधूच्या भावाचा कानपिळीचा मान केला जातो व त्याला आहेरही दिला जातो. यानंतर वर वधूचा हात धरून अग्नीला प्रदक्षिणा घालतो. अशा तीन प्रदक्षिणा करतात व खऱ्या अर्थाने लग्न लागले असे समजले जाते.

## सप्तपदी

सप्तपदीचे सात मंत्र खूप चांगल्या अर्थाचे आहेत. गुरुजींच्या मंत्रोच्चारांनुसार हा विधी होतो. पाटावर तांदुळाच्या सात राशी मांडतात. प्रत्यक्ष मंत्राच्यावेळी वधू आपले उजवे पाऊल एकेक राशीवर ठेवून चालते व वधूवर प्रदक्षिणा पूर्ण करतात. वधूला तू अन्नदात्री हो, सहा



ऋतुतील भोग देणारी हो आणि माझी प्रिय सखी हो असे म्हटले जाते. यानंतर वरवधू डोक्याला डोके लावतात व हा विधी पूर्ण होतो. (ब्राह्मण उपजातींनुसार घराण्यातील रूढी परंपरे नुसार विधीमध्ये थोडाफार बदल असतो. आपले गुरुजी सांगतील ते प्रमाण मानावे).

## ऐरणी दान (झाल)

वराकडील वडीलधारी मंडळींना पाटावर किंवा खुर्च्यांवर बसविले जाते. कणकेत हळद घालून तयार केलेले दिवे एका टोपलीत मांडून प्रज्वलित केले जातात व याला झाल असे म्हणतात. वधूचे आईवडील वराकडील ज्येष्ठ व्यक्तींच्या डोक्यावर झालं धरतात आणि आमच्या मुलीची तुमच्यावर आता जबाबदारी आहे असे सुचवितात. यावेळी वराच्या आईला आरसा, कंगवा, फणी सौभाग्यवाण, साडीचोळी व साखरेची ओटी देऊन मान केला जातो.

आजकाल कन्यादान, विवाह होम, सप्तपदी, ऐरणी दान (झाल) हे सर्व विधी सोय म्हणून लग्न विधीच्यापूर्वी करण्याची प्रथा रूढ होत आहे. यामुळे लग्नविधीला आलेल्या निमंत्रितांचे स्वागत करणे. भेट घेणे, सुसंवाद साधणे यासाठी वधूवरांना व त्यांच्या आईवडिलांना पुरेसा वेळ मिळतो.

## भोजन

सर्व पाहुणेमंडळी वधूवरांना आशीर्वाद देऊन भोजनाचा आस्वाद घेतात. शेवटी वधू-वर, वरमाई अशी खास पंगत असते. वधू व वर एकमेकांना उखाणा घेऊन घास भरवतात.

विहिणीसाठी (वरमाईसाठी) चांदीचे केळीचे पान व त्यापुढे कारल्याचा चांदीचा वेल ठेवतात. वरमाईचे भोजन सुरु झाले की “विहीण”, म्हणजे विहिणीसाठी स्वरचित किंवा पारंपरिक गाणी म्हणण्याची प्रथा होती, अजूनही काही लोक म्हणतात. वरमाईचे भोजन झाले की विड्यासोबत चांदीच्या लवंगा देतात.

विहीणीचे एक गाणे उदाहरणादाखल खाली दिले आहे,

ओटीत घातली मुलगी विहीण बाई
सांभाळ करावा हीच विनवणी पायी ।।धृ ।।
लाडकी लेक ही माझी पहिली वहिली
भाग्येत तियेच्या सून आपली झाली
तुम्हीच यापुढे तिजसी माझ्या ठायी ।।१।।

वधूमाय तुम्ही ही तुम्हा काही ठावे
वाटते तरीही काय उरी सांगावे
मी पदर पसरिते जन्मदायिनी आई ।।२।।

माहेर आपुल्या सत्पुरुषांच्या वंशी
सासरी वाढत्या सतत सुखाच्या राशी
पाठीशी आपुल्या नित्य उभी पुण्याई ।।३।।

यानंतर वर गौरीहराला नमस्कार करून पूजा केलेला बाळकृष्ण व अन्नपूर्णा देवीची मूर्ती खिशात ठेवतो, देवी पुढील लाडूगडु घेतो. यावेळी मुलीची मालत्यांनी ओटी भरतात व नववधू सासरी जायला निघते व वधूची पाठवणी होते. पाठवणीच्या वेळी वरपक्षाकडून वधूच्या आईला साडीचोळी देण्याची प्रथा आहे.

## लक्ष्मी पूजन

वधूवर सर्व कार्य आटोपून कार्यालयातून बाहेर पडतात व देवदर्शनाला जातात. घरापाशी नवदांपत्याचे आतषबाजीने व पायघड्यानी स्वागत होते. गृहप्रवेशाच्या वेळी नवरा नवरी वरून भाकरतुकडा ओवाळून, पायावर पाणी घालून घराच्या मुख्य दरवाज्याच्या बाहेर उभे करतात. गृहप्रवेशासाठी उंबऱ्यावर तांदूळ भरून सजविलेले माप ठेवतात, ते माप वधू उजव्या पायाने चौकटीच्या आत ढकलून गृहप्रवेश करते. तिच्या रूपाने घरी लक्ष्मीच आली असे समजले जाते. नंतर गुरुजींच्या मार्गदर्शनानुसार लक्ष्मी पूजन होते. या विधीमध्ये तबकातील तांदुळावर वर अंगठीने वधूचे नवीन नाव लिहितो. यावेळी वर त्याच्या इच्छेनुसार किंवा दोघांच्या संगनमताने वधूचे नाव बदलू शकतो किंवा आहे तेच लिहू शकतो. वर नवीन नावाचा उखाणा घेतो. सर्व उपस्थितांना पेढे वाटप केले जाते. आजकाल लक्ष्मीपूजन विधी कार्यालयातही करण्याची प्रथा आहे.

यानंतर वर गौरीहराला नमस्कार करून पूजा केलेला बाळकृष्ण व अन्नपूर्णा देवीची मूर्ती खिशात ठेवतो, देवी पुढील लाडूगडु घेतो. यावेळी मुलीची मालत्यांनी ओटी भरतात व नववधू सासरी जायला निघते व वधूची पाठवणी होते. पाठवणीच्या वेळी वरपक्षाकडून वधूच्या आईला साडीचोळी देण्याची प्रथा आहे.

## सुनमुख

हा धार्मिक विधी नसून रूढीप्रमाणे हा विधी केला जातो. वरमाई नव्या सुनेचे आरशातून मुख पहाते. आलेल्या लक्ष्मीला साडी चोळी, आरसा, कंगवा, दागिने व ओटी देतात व गोड पदार्थ भरवतात व नव्या सुनेला धीर देण्याचा प्रयत्न करतात.
यानंतर नवदाम्पत्याची खोली सजविणे, विनोदी कार्यक्रम, करमणूक झाली की विवाह समारंभ संपतो. कंकण सोडण्याचा कार्यक्रम मुलीच्या घरी लग्नाच्या दुसऱ्या दिवशी होतो. काही घरी दुसरेच दिवशी पूजा, बोडण, जागरण-गोंधळ हे घरात मंगलकार्य झाले की करण्याचे विधी केले जातात कारण पाहुणे मंडळी आपापल्या गावी जाण्यास मोकळी होतात. तसेच नवीन जोडी हनिमूनला जायला पण मोकळी होते.

सर्व कार्ये पार पडली तरी मुख्य कार्यक्रम असतो तो म्हणजे "विवाह नोंदणी" त्याची तारीख घेणे, कागदपत्र, फोटो साक्षीदार तयार ठेवणे याचे नियोजन विवाह सभारंभापूर्वीपासूनच करावे लागते.
विवाह नोंदणी हा विवाह समारंभाचाच एक भाग आहे व टाळून चालत नाही याची नोंद घ्यावी. शक्यतो हे काम नवं दांपत्याच्या रजा संपण्यापूर्वी करून घेणे श्रेयस्कर नाहीतर नंतर प्रत्येक ठिकाणी अडचणींचा सामना करावा लागतो.

लग्न समारंभ हे एक संमेलन आहे. हल्ली पाहुणे अगदी थोडा वेळ येतात, त्यांची व्यवस्था चोख ठेवावी लागते. केळवणाचा कार्यक्रम घरी असल्यामुळे त्याचे नियोजन आधीपासून चोख करावे. तसेच बांगड्या भरणारे, मेंदी, ब्युटिशियन, लायटिंग, फोटोग्राफर, फेटेवाले इत्यादींची संभावना करण्याची व्यवस्था आधी पासून तयार ठेवावी लागते. देण्याघेण्याच्या वस्तू व काही उपवासाचे पदार्थ आठवणीने कार्यालयात जाताना बरोबर ठेवावेत. कितीही तयारी केलीतरी लगीनघाई ही होतेच.

A Brahmin Matrimony Portal

लग्न म्हणजे दोन जीवांचं मिलन असतं, तसाच दोन घरांचा मेळ ही असतो, उभयपक्षांमध्ये कार्यक्रमानंतर सुद्धा आनंद व्दिगुणित व्हायला हवा. ऐश्वर्याच्या प्रदर्शनापेक्षा निर्मळ मानांच दर्शन घडावं हीच अपेक्षा. खिसा किती सैल सोडावा याचेही भान ठेवावे आणि घरचे कार्य सुव्यवस्थितपणे पार पाडावे. आनंद, मैत्री, प्रेम, उत्साह वर्धिष्णू व्हावा, हेच सोयरीकचही समाधान.

या लेखातील माहिती संकलित करताना विविध ठिकाणी आलेल्या लेखांचा संदर्भ घेऊन स्वतःच्या भाषेत लेखन केले आहे. हा लेख आपल्यासाठी सादर करतांना बऱ्याच ज्येष्ठ लोकांचं बहुमोल मार्गदर्शन लाभलं त्या सर्वांचे आभार.